व्यक्ति सर्वदा अन्यायाच्या साठी नसावा, पण न्यायाच्या साठी असावा

दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १३ एप्रिल २०२५ | अंक १२२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# छत्रपती शिवाजी महाराज अन राष्ट्र पुरुषांचा अवमान करणाऱ्यांची खैर नाही, मुख्यमंत्र्यांनी केली मोठी घोषणा



## नवी दिल्लीत स्मारक उभारणार

**नवी दिल्लीत शिवाजी महाराजांचे स्मारक असले पाहिजे. त्यासाठी आम्ही गृहमंत्र्यांना भेटू आणि त्यांची मदत घेऊन दिल्लीत स्मारक उभारु, अशी घोषणा फडणवीस यांनी केली. ते पुढे म्हणाले, शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा म्हणून नामांकन मिळाले आहे. आता फ्रान्समध्ये त्यावर सादरीकरण होणार आहे. आम्ही तिथे जाणार आहोत. त्यामुळे या किल्ल्यांना जागतिक वारसाचा दर्जा मिळेल, अशी आशा फडणवीस यांनी व्यक्त केली.**

## राज्यात कठोर कायदा करणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, उदयनराजे यांनी काही मागण्या केल्या. छत्रपतींचा अपमान करताना कठोर शिक्षा झाली पाहिजे. खरेतर त्यांना टकमक टोकावरूनच लोटले पाहिजे. परंतु आपण लोकशाही राहतो. त्यामुळे त्यासंदर्भात नियम तयार करण्याचे काम करण्यात येईल. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रमाण इतिहास राज्य शासन करणार आहे. शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा विषय आता सर्वोच्च न्यायालयातून उच्च न्यायालयात आला आहे. आम्ही उच्च न्यायालयात या प्रकरणी लढा देऊन स्मारक उभारण्याच्या मागणीत यश मिळवू.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रपुरुषांचे अवमान होण्याचे प्रकार वाढले आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज आणि राष्ट्रपुरुषांचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी होऊ लागली आहे. त्याबाबत काही दिवसांपूर्वी उदयनराजे भोसले यांनी मुख्यमंत्र्यांना पत्रही लिहिले होते. आता शिवाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी किल्ले रायगडावरुन शनिवारी मोठी घोषणा केली. राष्ट्रपुरुषांचा अवमान करणाऱ्यांना शिक्षा करण्यासाठी कायदा करण्यात येणार आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रमाण इतिहास शासनाकडून प्रसिद्ध करण्यात येईल, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. छत्रपती शिवाजी महाराज आपले दैवत का आहेत? त्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज असताना देशात आदिलशाही, मोघलाई, कुतबशाही होती. परकीय आक्रमकांचे राज्य कधीच संपणार नाही, असे वाटत होते. सर्वत्र अंधकार झाला होता, असे वाटत होते. तेव्हा आई जिजाऊंच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांसारखा तेजस्वी सूर्य निर्माण झाला. शिवाजी महाराज नसते तर आपण कोणीच नसतो. कारण आपल्यातील तेज जागवण्याचे काम शिवाजी महाराजांनी केले. आठरापगड जातीच्या लोकांना एकत्र करून त्यांनी आपल्यामधील तेज जागृत केले. मावळ्यांना एकत्र करून हिंदवी स्वराज्याची स्थापन केली. संपूर्ण भारतात केवळ शिवाजी महाराजांमुळे भगव्याचे राज्य आले.

# पौळाचीवाडी येथे विविध मागण्यांसाठी शरद जाधव यांचे उपोषण तिसऱ्या दिवशीही प्रशासनाचे दुर्लक्ष; अधिकारी आंदोलनाकडे फिरकले सुध्दा नाही

गेवराई : प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील पौळाचीवाडी येथे पाणी टँकर सुरु करावे यासह विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते शरद जाधव हे गावातील मंदिरात बुधवारपासून उपोषणाला बसले आहेत. दरम्यान शुक्रवारी तिसऱ्या दिवशी देखील प्रशासनाने या आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. तीन दिवसांत कोणताही प्रशासकीय अधिकारी या आंदोलनस्थळी फिरायला नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान शरद जाधव यांच्या या आंदोलनाला ग्रामस्थांनी पाठिंबा



दर्शविला आहे.

पौळाचीवाडी येथे मागील महिण्यापासून तिव्र पाणी टंचाई आहे. याबाबत गटविकास अधिकारी तसेच तहसीलदार यांना निवेदन देऊन देखील दखल घेतली नाही. परिणामी गावात सध्या पिण्याच्या पाण्याची नागरिकांना भ्रांत असून पाण्याच्या शोधात नागरिकांना पायपीट करावी लागत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत असून पाणी टंचाईमुळे गावात तात्काळ पाणी टँकर सुरू करण्यात यावे, गावातील अमृता नदीवरील बंधाऱ्यातुन गाळ ऊपसा करण्यात यावा, संजय गांधी यासह श्रावण बाळ योजनेत पौळाचीवाडी गावातील गोरगरीब लोक घ्यावेत, पौळाचीवाडी ते तरडगव्हान रस्ता डांबरीकरण करण्यात यावा, खळेगाव ते बंगाली पिंपळा रस्ता व खळेगाव ते ऊमापुर रस्ता डांबरीकरण करण्यात यावा या मागणीसाठी गावातील सामाजिक कार्यकर्ते शरद जाधव हे पौळाचीवाडी येथील मंदिरात बुधवारी उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या आंदोलनाला ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे. मात्र तीन दिवस उलटून देखील या आंदोलनाकडे प्रशासनाचा कोणताही अधिकारी फिरकला नाही. त्यामुळे ग्रामस्थांच्या समस्या बाबत प्रशासन उदासीन असल्याचे यावरून दिसून येते. दरम्यान शरद जाधव यांच्या या आंदोलनाला अनिल शेंडगे, सुदाम पवार, पाराजी गायकवाड, रामनाथ मराठे, आण्णासाहेब साळुंखे, सिद्धेश्वर घार्गे, अर्जुन जाधव, धर्मराज पौळ, पांडुरंग जाधव, बबनराव माने, पिंटू पौळ, आर्जुन पौळ, श्रीमंत शेंडगे, सुरेश शेंडगे, रामनाथ पिकवणे ,बिभीषण पठाडे, मछींद्रनाथ पौळ, भिमराव पिकवणे, जालींदर धुमाळ, गोरख साळुंखे, भाऊसाहेब पिकवणे, रामजी तुळसीराम पौळ, भारत साळुंखे, कचरू पौळ पाटील, महादेव महाराज पौळ, हनुमान मैंद, कृष्णा पौळ, भारत अशोक पौळ आदींसह ग्रामस्थांनी पाठिंबा दर्शविला आहे.

## .अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी



बीड दि. 11 :- अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

सदरील जयंती साठी मन्सुरी अन्सार निसार अहमद जि.अधिक्षक शासकीय निरीक्षणगृह बीड,मंगेश बबनराव जाधव जिल्हा परीविक्षा अधिकारी, संतोष वारे बाल कल्याण समिती सदस्य,बालीका शिंधीकुंमठे शिक्षीका, तौफीक हमीद शेख काळजी वाहक,पौर्णिमा कांबळे,शेख नदीम लतीफ,संतोष शिंदे ,माधुरी शिंदे.आदी उपस्थित होते.

# खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचा आज रविवार १३ मार्च २०२५ रोजी परळी तालुका दौरा तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज

परळी (वार्ताहर) बीड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांचा आज रविवार 13 मार्च 2025 रोजी परळी तालुका दौरा होत असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी दिली आहे खासदार साहेबांचा दौरा पुढील प्रमाणे असणार आहे बाभळगाव ता



माजलगाव येथून भिलेगाव तालुका परळी वैद्यनाथ जिल्हा बीड कडे 10.45 वा प्रयाण भिलेगाव येथे 11.20 वा मा सरपंच माणिकराव कडभाने यांचे निवासस्थानी सांत्वनपर भेट भिलेगाव येथून 11. 35 वा कानडी ता परळी कडे प्रयाण कानडी येथे 11.45 वा लहूदास कदम यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट कानडी येथून आचार्य टाकळीकडे 12.00 वा प्रयाण आचार्य टाकळी येथे 12.15 वा अखंड हरिनाम सप्ताह निमित्त उपस्थिती आचार्य टाकळी येथून सिरसाळ्याकडे 01.00 वा प्रयान सिरसाळा येथे सरपंच अन्वर पट्टेदार यांच्या निवासस्थानी 01.15 वा सदिच्छा भेट होईल व त्यानंतर पुढील कार्यक्रमासाठी प्रस्थान करतील या दौऱ्यामध्ये पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज यांनी केले आहे

# क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती वडवणी शहरात उत्साहात साजरी

वडवणी : वडवणी शहरांमध्ये क्रांतीसुर्य शिक्षणाचे अग्रदूत महात्मा फुले यांची १९८ वी जयंती आज वडवणी शहरांमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. वडवणी शहरातील बहुजन समाजाच्या वतीने आज क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या जयंतीच्या आयोजन महात्मा फुले चौक वडवणी या ठिकाणी करण्यात आले होते. या चौकामध्ये वडवणीचे माजी नगराध्यक्ष राजेभाऊ अण्णा मु ंडे नगराध्यक्ष शेषेराव बापू जगताप बिटअंमलदार राऊत साहेब यांच्या शुभहस्ते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्ष राजेभाऊ अण्णा मु ंडे नगराध्यक्ष शेषेराव जगताप ओबीसी नेते प्रा. वैजनाथ शिंदे बी .एम. पवार सभापती बाबासाहेब वाघमारे,आप्पासाहेब पवार,बाबासाहेब साळवे , ॲड.भास्कर उजगरे भावसार समाजाचे महेश सदरे धनगर समाजाचे शहाजी लोकरे डिजिटल मीडियाचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे ,संपादक सतीश वाघमारे,मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष सतीश सोनवणे, पत्रकार भैय्यासाहेब तांगडे,सतीश मुजमुले ,कृष्णा शिंदे ,बालाजी शिंदे ,नारायण शिंदे ,रमेश शिंदे ,कल्याण शिंदे ,लक्ष्मीकांत शिंदे, विशाल शिंदे ,प्राध्यापक तेजस शिंदे, वैभव शिंदे ,सुरेश भोरे,दीपक उजगरे ,अण्णासाहेब मस्के, माऊली कटारे, पडूळे टेलर ,गणेश शिंदे, पपू शिंदे, महात्मा फुले यांच्या वेशात प्रगती शिंदे ,यांच्यासह सर्व क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती

# रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवणार अमित शाह यांची मोठी घोषणा



शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला ती हीच जागा आहे. शिवाजी महाराज यांचा जन्म झाला ती ही जागा आहे. शिवाजी महाराजांनी शेवटचा श्वास घेतला ती ही जागा आहे. बालशिवाजीपासून ते छत्रपतीपर्यंतचा इतिहास या पवित्र भूमीत आहे. रायगड पर्यटन नव्हे तर प्रेरणास्थळ बनवण्यासाठी आमचे सरकार कटीबद्ध आहे. सातवीपासून ते बारावीपर्यंतचे विद्यार्थी या ठिकाणी आले पाहिजे. त्यांनी महाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेतली पाहिजे, असे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शनिवारी सांगितले. किल्ले रायगडावर शिवाजी महाराज यांच्या पुण्यतिथिनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अमित शाह म्हणाले, शिवाजी महाराजांचा अर्थ समर्पण बलिदान, शौर्य आहे. स्वाभिमान आहे. स्वराज्याची अमर विजिगिषा आहे. या भूमीत जो कोणी येतो तो नवीन ऊर्जा आणि चेतना घेऊन जातो. प्रत्येक तरुणाला या प्रेरणा स्थळावर येऊन प्रेरणा घेतली पाहिजे. न्यायासाठी शिवाजी महाराजांनी अनेक सिद्धांत दिले. सुशासन कसे असले पाहिजे याचे सर्वात मोठे उदाहरण त्यांनी घालून दिले. शिवाजी महाराजांचा अंतिम संदेश काय होता. ते म्हणायाचे, स्वराज्याची लढाई कधी थांबू नये, स्वधर्माची लढाई थांबू नये, स्वभाषेची लढाई थांबू नये, असे त्यांनी म्हटले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात शिवाजी महाराज यांच्या आदर्शाची ही लढाई गौरवाने सुरू असल्याचे अमित शाह यांनी सांगितले. ते म्हणाले, देशाला जगात मान मिळत आहे. शिवाजी महाराजांनी काशीचा उद्धार करण्यास सांगितले. काशी विश्वनाथाचे कॉरीडोअर आणि राम मंदिराचे काम मोदींनी केले, असे अमित शाह यांनी म्हटले. स्वातंत्र्याला शंभरवर्ष होतील तेव्हा आपला देश जगात पहिल्या क्रमाकांवर असणार आहे, असे अमित शाह यांनी म्हटले.

अफजलखान याचे नाव न घेता अमित शाह म्हणाले, स्वत:ला अलमगीर म्हणणारा व्यक्ती महाराष्ट्रात पराजित झाला. त्याची समाधी महाराष्ट्रात आहे. शिवचरित्र प्रत्येक भारतीयांना शिकवले गेले पाहिजे. प्रत्येक मुलाला शिकवले पाहिजे. शिवाजी महाराजांना महाराष्ट्रापर्यंत मर्यादित ठेवू नका. हात जोडून विनंती करतो. देश आणि जग त्यांच्याकडून प्रेरणा घेत आहे, असे त्यांनी सांगितले.

## संपादकीय

### चला गावाला जाऊया

गावामध्ये रोजगाराच्या संधी नसल्यामुळे गावातील नागरिक रोजीरोटीसाठी शहराकडे जातात. त्यामुळे आज ग्रामीण भागात गेल्यावर बरीच घरे बंद असताना दिसतात. कधी एकदा मुलांची परीक्षा संपते आणि गावी जाऊन येतो असे चाकरमान्यांना झाले आहे. कोकणात शहरात राहणाऱ्या व्यक्तीला चाकरमानी असे आदराने गावातील लोक म्हणतात. तसे गावी गेल्यावर गावची मंडळी त्यांचा पाहुणचार सुद्धा आदराने करतात. त्याप्रमाणे चाकरमानी पुन्हा परतीच्या प्रवासाला निघतात तेव्हा त्याच्या हातात पानसुपारीसाठी दोनशे किंवा पाचशे रुपयाची करकरीत नोट ठेवायला विसरत नाहीत. दहावी आणि बारावीची बोर्डाची परीक्षा संपली तरी अजून प्राथमिक, माध्यमिक आणि विविध पदव्यांच्या परीक्षा अजून बाकी आहेत. मी लहान असताना माझ्या आयनल गावी उन्हाळ्याच्या सुट्टीत वाडीतील मंडळी गावी आल्यावर मी त्यांना विचारायचो कोणत्या गाडीने आलाय? तेव्हा प्रभाकरची आई म्हणायची ङ्गरातराणीफ गाडीने! मला प्रश्न पडायचा लालपरी म्हणतात. मग हिची ङ्गरातराणीफ गाडी कोणती, असा प्रश्न मला पडायचा. तेव्हा एक दिवस एका एसटी वाहकाला विचारले की ङ्गरातराणीफ हा गाडीचा प्रकार कोणता? तेव्हा त्यांनी मला सांगितले, ही दुसरी तिसरी गाडी नसून आपली सर्वांची लालपरी. ती रात्रीची येते म्हणून तिला चाकरमानी मंडळी ङ्गरातराणीफ म्हणतात. आता मात्र चाकरमानी लालपरीकडे प्रवासासाठी दुर्लक्ष करतात. आता सर्रास रेल्वेने येतात. काही चाकरमानी तर आपली स्वतःची गाडी घेऊन येतात. त्यामुळे लांब पल्ल्याच्या लालपरी बऱ्याच ठिकाणी बंद करण्याची वेळ आली आहे. असे असले तरी काही मंडळी लालपरीने येणे पसंत करतात. तेव्हा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवासी वाहतूक करत असताना प्रवाशांच्या सेवेसाठी आणि चांगल्या प्रकारची सेवा देणे गरजेचे आहे. कारण बारा ते पंधरा तास प्रवास करायचा असेल, तर प्रवाशांना चांगल्या प्रकारच्या सेवा देणे गरजेचे असते. त्यात रस्त्याची कामे सुरू आहेत. त्यामुळे चाकरमानी रेल्वेने जाणेच पसंत करतात. असे असले तरी लालपरीचा प्रवास अधिक सुखाचा असतो. प्रत्येक आगारात बस थांबते त्यामुळे प्रत्येक आगाराची रचना अशी असते हे त्यानिमित्ताने जवळून पाहता येते. कितीही झाले तरी उन्हाळ्याच्या सुट्टीत प्रत्येक जण आपल्या गावी जाऊन येतात. प्रत्येकाला आपल्या गावाची ओढ असते. त्यामुळे न चुकता गावी जातात. कोकणात तर मे महिना सोडा, सणासुदीच्या दिवसातही जर रजा मिळाली नाही तर लोक म्हणातात नोकरीचे काय होईल ते होईल, पुढे पाहू; परंतु गावी जाऊन येतात. इतका कोकणी माणूस श्रद्धाळू आहे. त्याचमुळे म्हटले जाते की, कोकणची माणसं साधी भोळी काळजात त्यांच्या भरली शहाळी!! उन्हाळा सुरू झाल्यावर त्यांना गावची आठवण येत आहे. जो तो जुन्या आठवणींना उजाळा देत आहेत. वर्षभरानंतर जिवाभावाची माणसे भेटणार आहेत. काहीजण तिकीट काढून एक एक दिवस कसा जातो हे मोजत आहेत. लहान मुले तर आजी-आजोबांची आठवण काढत आहेत. आजोबांच्या मांडीवर कधी बसतो असे झाले आहे. तसेच गावच्या काकांची व वाडीतील मुले आपली वाट पाहत असतील. त्यांना केव्हा एकदा भेटतो आणि आपल्या गावच्या गोठ्यात बांधलेल्या बैलांना बिस्कीट त्यांच्या तोंडासमोर केव्हा टाकतो असे मुलांना वाटत आहे. संध्याकाळी घरासमोरील वाफ्यात केव्हा एकदा वाडीतील मुलांना घेऊन क्रिकेट खेळतो असे झाले आहे. दुसऱ्या दिवशी गावच्या काकांबरोबर बैलांना घेऊन रानात जाणार. रानातील भरडावर फिरताना किंवा कुंभयाच्या झाडाखाली बसून समोरच्या डोंगरातील झाडे मोजताना तसेच आंब्याच्या झाडावर दगड गावच्या मुलांबरोबर मारताना एक वेगळीच मजा असते. काकाने करवंदे काढून कुंभयाच्या पानात द्यायची आणि आपण त्यावरती ताव मारायचा. नंतर संध्याकाळी चुलीवरचे काकूने केलेले जेवण जेवल्याने सकाळ केव्हा व्हायची हे समजत सुद्धा नाही. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी काकू चुलीत काजू भाजून नंतर फोडून द्यायची. आठवड्याच्या बाजाराला जाऊन मासे आणून मासे तळलेले व माशांचा सार उत्तम करायची. मात्र तेवढीच गावची माणसे दररोज वेगवेगळ्या पद्धतीने पाहुणचार करत असतात. जसजसे परतीचे दिवस जवळ येतात तस तसे मन भरून येत असते. असे वाटते आता शहरात जाऊच नये.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या दुखण्यावर तोडगा कधी निघणार ?

राज्य सरकारमध्ये कार्यरत असणाऱ्या मंत्रालयीन तसेच विविध शासकीय आस्थापनेचे कर्मचारी, अगदी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर्मचारी वेतनाबाबत समाधानी असतात, त्यांना नियमित वेतनवाढ होत असते. वाढत्या महागाईच्या तुलनेत त्यांच्या वेतनवाढीचा ग्राफही उंचावत असतो. हे मासिक वेतन त्यांना नियमितपणे प्राप्तही होत असते. वर्षभर काम केल्यावर मिळणारा बोनस, सानुग्रह अनुदानही समाधान करणारे, दिलासा देणारे असते. राज्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत बोलावयाचे झाल्यास सर्वच बाबतीत ङ्गओला दुष्काळफ असताना याला एसटी कामगारांच्या समस्येचे ग्रहण लागावे, इतपत आजमितीस भयावह चित्र निर्माण झालेले आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या आणि अधिकाऱ्यांच्या पाचवीच्या दिवशी सटवाईने कदाचित आर्थिक ससेहोलपटचे भाकीत लिहिलेले असावे. त्यामुळे गेल्या काही वर्षांपासून एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक समस्येच्या चक्रव्यूहामध्ये भरडले जात आहेत. अनेकदा आंदोलने करूनही, निदर्शने करूनही त्यांच्या समस्यांचे आजतागायत निवारण झालेले नाही व सध्याचे चित्र पाहता नजीकच्या काळातही यात फारसा बदल होईल, असे वाटतही नाही. एप्रिल महिन्याची १० तारीख लोटलेली असताना शासकीय तसेच खासगी आस्थापनेतील कर्मचाऱ्यांना त्यांचे वेतन मिळालेले आहे. एसटी कर्मचाऱ्यांना एप्रिल महिन्याच्या १० तारखेला एकूण वेतनाच्या जेमतेम अर्धाच पगार खात्यामध्ये जमा झाला आहे. उर्वरित पगार लवकरच खात्यात जमा होईल, असे उत्तर त्यांना शासनाकडून देण्यात आलेले आहे. मुळातच महिना भरल्यावर कर्मचारी आतुरतेने वेतनाची वाट पाहत असतात. मागील महिन्यात केलेल्या परिश्रमाच्या मोबदल्यावर त्यांची या महिन्याच्या आर्थिक समीकरणाची जुळवाजुळव सुरू असते. त्यातच आपल्या बँक खात्यात केवळ अर्धाच पगार जमा झाल्याचे समजल्यावर त्या कर्मचाऱ्यांची मानसिक अवस्था काय होत असेल, याची कल्पनादेखील करणे अवघड आहे. एसटी कर्मचाऱ्यांनी वेतनवाढ व अन्य समस्यांसाठी काही वर्षांपूर्वी प्रशासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडले होते, महिन्याहून अधिक कालावधी लोटला तरी एसटीच्या बसेस आगाराबाहेर पडल्या नव्हत्या. रस्त्यावर एसटीची एकही बस धावताना पाहावयास मिळाली नव्हती. आज प्रवासी सुविधेमध्ये अनेक बदल होत असले, खासगी प्रवासी सुविधांचा आलेख उंचावत असला तरी राज्यात एसटीच्या प्रवासी सेवेचे कोणीही बरोबरी करू शकत नाही. एसटीच्या प्रवासी सुविधेमुळेच आज खऱ्या अर्थाने प्रवासी तिकिटांचे दर आवाक्यात आहेत अन्यथा खासगी प्रवासी सुविधा देणाऱ्यांनी आर्थिक लुटमार बेमालूमपणे केली असती. या आंदोलन काळात महाराष्ट्रातील जनतेचे अतोनात हाल झाले. खासगी प्रवासी सुविधेला प्रशासनाकडून त्या काळात अल्प कालावधीकरिता संरक्षण देण्यात आले असले तरी त्यांच्याही सेवा पुरविण्याला अखेर मर्यादा पडल्या. एसटीची प्रवासी सुविधा आर्थिक नफ्याची सांगड न घालता प्रवाशांच्या समाधानाकरिता व त्यांना गावागावात प्रवासी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एसटीची बस धावत आहेत. एसटीचे चालक वाहकांना रात्रीच्या मुक्कामाच्या ठिकाणी सुसज्ज शयनगृहे उपलब्ध नसतात. त्यांना मिळेल त्या जागेवर रात्र काढावी लागते. अनेकदा एसटी बसमध्ये रात्रीची झोप घ्यावी लागत असल्याचे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात पाहावयास मिळत आहे. असे असतानाही एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांची कमी वेतन, वेतनास विलंब ही आर्थिक ससेहोलपट कायम असावी, ही त्या कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या नशिबाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. एसटी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढताना न्यायालयात राज्य सरकारने एसटी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या वेतनाची जबाबदारी स्वीकारली होती; परंतु त्या जबाबदारीचे पालन करण्यास राज्य सरकारकडून प्रत्येक महिन्याला चालढकल केली जात असल्याने आर्थिक संकटाच्या चक्रव्यूहामध्ये एसटीचे कर्मचारी, अधिकारी भरडले जात आहेत. दर महिन्याला एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून वेळेवर तोही माफक प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात नाही. आजही एसटी महामंडळाचे दररोजचे प्रवासी उत्पन्न काही लाखांच्या घरात आहे. त्या त्या काळातील सत्ताधारी राजकीय घटकांनी प्रवाशांना सुविधा देण्याच्या नावाखाली एसटीच्या उत्पन्नात घट आणली आहे. मात्र ही घट भरून काढण्यासाठी एसटी महामंडळाला निधी उपलब्ध करून देणे, ही त्या त्या सत्ताधाऱ्यांची जबाबदारी असते. पण हीच जबाबदारी राज्य सरकारांनी न स्वीकारल्याने एसटी महामंडळ, एसटी कर्मचारी व अधिकारी आर्थिक चक्रव्यूहामध्ये फसत गेले व त्यामुळेच आज महिन्याच्या दहा तारखेला अर्ध्या वेतनाकडे पाहण्याची दुर्दैवी वेळ एसटीच्या कर्मचारी, अधिकाऱ्यांवर आलेली आहे. महिलांना एसटी प्रवास केवळ अर्ध्या तिकिटामध्ये उपलब्ध करून दिलेला आहे. यामुळे महिला प्रवासीरूपी मतदार राज्य सरकारमधील सत्ताधाऱ्यांवर खूश झालेला आहे. तथापि या अर्ध्या तिकिटामुळे एसटी महामंडळाचे दर महिन्याला किती लाखांचे नुकसान होणार आहे, याचा विचार ना राज्य सरकारने कधी केला आहे, ना अर्ध्या तिकिटामध्ये प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांनी केला आहे. याशिवाय ७५ वर्षे वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास राज्य सरकारने उपलब्ध करून दिलेला आहे. पण या मोफत प्रवासासाठी राज्य सरकारने एसटीला आर्थिक मदत करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक होते; परंतु येथे राज्य सरकारने उदासीनतेचे धोरण अवलंबत काढता पाय घेण्याची भूमिका घेतलेली आहे. ङ्गमुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेफसाठी राज्य सरकारने दर महिन्याला करोडो रुपयांचा निधी उपलब्ध होत आहे. दर महिन्याला लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये न मागताही १५०० हजार रुपये जमा होत आहेत. निवडणूक काळात तर लाडक्या बहिणींच्या खात्यात २१०० रुपये जमा करण्याचे आश्वासनरूपी घोषणाही करण्यात आली होती. लाडक्या बहिणींना निधी देण्याची तजवीज राज्य सरकारकडून दर महिन्याला करण्यात येत आहे, मात्र दररोज लाखो रुपयांचे प्रवासी उत्पन्न राज्य सरकारला मिळवून देणाऱ्या एसटीच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या वेतनासाठी तजवीज करण्यासाठी राज्य सरकारकडू न कोणत्याही महिन्याला स्वारस्य दाखविले जात नाही. आज एसटी कर्मचाऱ्यांची अवस्था ङ्गरोज मरे, त्याला कोण रडेफ अशा स्वरूपाची झालेली आहे. गेली अनेक महिने आर्थिक समस्येत एसटी कर्मचारी भरडला जात असतानाही या कर्मचाऱ्यांना कोणी वालीच शिल्लक राहिला नसल्याचे चित्र निर्माण झाले आहे. एसटी महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या आर्थिक दुखण्यावर तोडगा कधी निघणार? याचे उत्तर नजीकच्या काळात सापडले न गेल्यास एसटीचे कर्मचारी पुन्हा संपरूपी आंदोलनाचे हत्यार उगारण्याची भीती आहे.

## विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवगाव यांच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आव्हान.

वडवणी / प्रतिनिधी अंकुश गवळी भारत देशातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती मोठ्या थाटामाटात साजरी होणार आहे. भारतीय राज्यघटनेचा भारत देशालाच नव्हे तर जगाला हेवा वाटावा असा हा ग्रंथ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी लिहून या भारताला जगाचा नकाशावर नेऊन ठेवले आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय इतिहासातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व आहेत ज्यांनी शिक्षण व राजकारणाचा क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले त्यांनी जगातील काही प्रतिष्ठित संस्था म्हणून शिक्षण घेतले जात मुंबईतील एलिफन्टन कॉलेज युके मधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ यांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी “शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा”, हा मूलमंत्र देत बहुजनांना उन्नती आणि समाजोद्धाराचा मार्ग दाखवला. सामाजिक न्याय व समतेचा पुरस्कार करत समाजातील उपेक्षितांसाठी संघर्ष करणारे महामानव, प्रज्ञासूर्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंती दिनी विनम्र अभिवादन! वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव येथे विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्यावतीने



नियोजन केलेले आहे दिनांक 14 एप्रिल 2025 रोजी सकाळी ठीक आठ वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण होईल तसेच मंगळवार दिनांक 22 एप्रिल 2025 रोजी सायंकाळी सहा वाजता महाराष्ट्रात सर्वत्र गाजत असलेले तुफान विनोदी समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराजांचे शिष्य इंजिनीयर पवन महाराज दंवडे यांचा कार्यक्रम होईल मंगळवारी सायंकाळी आठ वाजता बक्षीस वितरण होईल त्यामध्ये निबंध स्पर्धा चित्रकला स्पर्धा गावची एक लाडकी लेक लक्की ड्रॉ कन्यादान योजना मंगळवारी ठीक आठ वाजता कार्यक्रम होईल व तसेच बुधवार दिनांक 23 एप्रिल 2025 सायंकाळी पाच वाजता विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक होईल या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती देवगाव यांच्या वतीने करण्यात आलेले आहे. .

# जि.प.शाळेत महात्मा फुले जयंती व रमजान ईद निमित्त एकतेचा संदेश

जामखेड ।प्रतिनिधी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मराठी मुले व मुले), जामखेड येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त ङ्गसमता दिनफ आणि रमजान ईद निमित्तङ्गसर्वधर्मीय ईद-ए-मिलानफ हा संयुक्त कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि सामाजिक सलोख्याच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांना गुलाबपुष्प देत गळाभेटी घेत ईद मुबारकच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष मौलाना खलील कस्मी यांनी रमजानच्या उपवासाचे सामाजिक महत्त्व विशद करताना प्रेम, दया व समतेचे मूल्य सांगितले आणि शाळेच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. यावेळी बोलताना ह.भ.प. बाळासाहेब गाडे महाराज यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून मानवता हाच खरा धर्म असल्याचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सामाजिक



कार्यकर्ते मुख्तार सय्यद,बाजार समितीचे संचालक सुधीर राळेभात,राष्ट्र वादी काँग्रे स पार्टीचे तालुका अध्यक्ष महेश निमोणकर, युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे,भाजपा शहराध्यक्ष पवन राळेभात,माजी सैनिक मुस्तफा शेख,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नासीर सय्यद,( मुले) ,प्रा. डॉ. शिवाजी राळेभात अध्यक्ष (मुली), निलेश गायकवाड, नगरसेवक अर्शद शेख,अमोल गिरमे,उद्योजक विपुल कुलकर्णी,जावेद शेख,तौफिक शेख, अमित गंभीर,अक्षय म्हेत्रे, मनोज वराट आदी मान्यवर व विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी विजय शेवाळे, विस्ताराधिकारी जालिंदर खताळ, केंद्रप्रमुख नवनाथ बड े यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक (मुली) दत्तात्रय यादव,उपाध्यापिका शैलजा बडे,सुमन खेडकर, अर्चना भोसले, सोनाली झोरे, मंजुषा कानडे, प्रतिभा ढोबळे, निशा कदम,मनिषा पवार, निर्मला सिध्देश्वर, वंदना मोरे , कल्पना ससाणे,डिसले, कल्पना साबळे ,रेखा साळे, कालिंदी म्हेत्रे,अल्का धाऊड,सरिता कवडे, राणी वराडे , शिरिष कदम, नितीन मोहळकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबादास जोगदंड व सूत्रसंचालन सागर माकुडे यांनी केले तर आभारप्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक (मुले) संजय कर्डिले यांनी मानले.कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना शिरखुर्मा व गुलगुले वाटप करण्यात आले.

## राधाकृष्ण नागरी येथील हरीनाम सप्ताहात जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा सत्कार




बीड : (प्रतिनिधी) पांगरी रोड येथील राधाकृष्ण नागरी येथे हनुमान जयंती निमित्त अखंड हरीनाम सप्ताह चे आयोजन करण्यात आले होते. आज त्याची सांगता ह.भ.प सुरेशानंदजी महाराज कोळेकर यांच्या काल्याच्या हरीकीर्तनाने झाली. या सप्ताहच्या सांगतेचे मुख्य यजमान म्हणून शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम हे होते.

यावेळी उल्हास गिराम यांच्या हस्ते महाराजांचा आदरसत्कार करण्यात आला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हाप्रमुखपदी उल्हास गिराम यांची निवड झाल्याबद्दल सप्ताह आयोजन समितीच्या वतीने गिराम यांचा सत्कार करण्यात आला, या वेळी आयोजक गणेश खाडे, मधुकर बालटे, दिपक बिल्पे, मुकेश शिवगन, सचिदानंद देशमुख, नरेंद्र कुलकर्णी, रवींद्र बाजगुडे सह परिसरातील भक्तगण मोठया प्रमाणावर उपस्थित होता.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १३ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# स्व.एम.ई. भोरे ज्यु.कॉलेज येथे महात्मा फुले जयंती साजरी

जामखेड । प्रतिनिधी जामखेड तालुक्यातील पाडळी फाटा येथील सनराईज मेडिकल अँड एज्युकेशन फाउंडेशनच्या स्व. एम.ई. भोरे ज्युनियर कॉलेजमध्ये क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजच्या ज्येष्ठ शिक्षिका प्रा. स्वाती पवार होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थिनींनी- कु. श्रेया जगताप, कु. आम्रपाली गव्हाळे, कु. प्रांजली कांबळे आणि कु. फिजा सय्यद यांनी महात्मा फुले यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांसमोर उलगडले. त्यांनी स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि मानवतावाद यावर आधारित विचार मांडले.महात्मा फुले यांनी प्रजासत्ताक मूल्यांचा प्रसार करताना स्त्री-पुरुष समानता, शिक्षणाचे महत्व आणि सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून बहुजन समाजाच्या उत्थानासाठी आयुष्य वेचले, हे शिक्षकांनी आपल्या भाषणांतून अधोरेखित केले. यावेळी प्रा. नारायण आयकर, प्रा. विनोद बहिर, प्रा. प्रदीप भोंडवे, प्रा. दादासाहेब मोहिते, प्रा. छबिलाल गावित

# आदिलाबाद किनवट नांदेड रेल्वे मार्गावरील प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयी त्वरित थांबवा-पत्रकार परिषदेची निवेदनाद्वारे मागणी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : दक्षिण मध्य रेल्वेचे नांदेड विभागीय व्यवस्थापक हे शनिवार १२-एप्रिल रोजी किनवट दौ-यावर आले असता त्यांचे स्वागत किनवट येथील पत्रकारांनी केले तर आदिलाबाद ते नांदेड मार्गावरील रेल्वे प्रश्नासंदभात चर्चा केली व मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निवेदन देण्यात आले.असता त्यांनी माझ्या अधिकारातील प्रश्न सोडवु असे आश्वासन दिले तर बाकीचे प्रश्न आम्ही रेलेवे बोर्डाला पाठवु असे यावेळी उपस्थित पत्रकारांना सांगितले.

यावेळी पत्रकारांनी नंदिग्राम एक्सप्रेस नागपुर पर्यंत विस्तारीत करावी, आदिलाबाद ते परळी



जी डेमो सवारी गाडी धावत आहे त्याएवजी पुर्वीची पॅसेंजर गाडी चालु करावी, आदिलाबात ते नांदेड इंटरसिटी एक्सप्रेस ही गाडी मागील अनेक दिवसापासून माळटेकडी पर्यंत किंवा रद्द करण्यात येत आहे त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ती इंटरसिटी गाडी रोज नियोजित वेळेत नांदेड रेल्वेस्टेशन पर्यंत करावी, पुणे येथे विद्यार्थ्यांना शिक्षण व नौकरी संदर्भात जावे लागते नांदेड येथून दोन रेल्वे गाड्या धावतात त्यापैकी एक गाडी आदीलाबाद पर्यंत विस्तारित करण्यात यावी, रेल्वे स्थानकावर डिजिटल डिस्प्ले तिकीट बुकिंग काउंटर ची सुधारणा वायफाय सेवा व ॲप द्वारे माहितीची सुविधा उपलब्ध करून द्यावी.अशा आशयाचे निवेदन मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात आले.किरण तिरमनवार कचरू जोशी यांनी मुंबई ते नांदेड धावणारी तपोवन एक्सप्रेस गाडी आदिलाबाद पर्यंत विस्तारीत करण्यात यावी व शहरातील शिवाजी नगर येथिल रेल्वे अंडर ब्रिज रुंद करण्यात यावे एक अतिरिक्त रेल्वे अंडर ब्रिज मंजुर आहे त्याचे हि काम सुरु करावे अशी मागणी निवेदनाव्दारे केली.यावेळी रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.तर पत्रकारांच्या शिष्टमंडळात जेष्ठ पत्रकार माजी नगराध्यक्ष के.मुर्ती, गोकुळ भवरे, पत्रकार परिषदेचे सचिव बालाजी सिरसाट कार्याध्यक्ष किरण ठाकरे, किरण तिरमनवार, संजीव बॅनर्जी, कचरु जोशी यांची उपस्थिती होती.

## उमरा परसराम तांडा येथील नागरिकांची पाण्यासाठी भटकंती मुके जनावरे ही पंधरा दिवसापासून तहानलेलेच

# उमरा ग्रामपंचायतचे सपशेल दुर्लक्ष-सरपंच राज्याबाहेर उपसरपंच जिल्ह्यावर तर ग्रामसेवक तालुक्याला-कसे मिळेल पाणी प्यायला

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील उमरा येथील परसराम तांडा येथे भर उन्हाळ्यात ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गेल्या पंधरा दिवसापासून कृत्रिम पाणी टंचाई निमर्ाण झाल्याने रहिवाशी नागरिकासह मुक्या जनावरांना पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ आली असून पाणी पुरवठा लवकर सुरळीत करून देण्याची मागणी परसराम तांडावासीय करत आहेत.तर या समस्येकडे उमरा ग्रामपंचायतचे सपशेल दुर्लक्ष-सरपंच राज्याबाहेर उपसरपंच जिल्ह्यावर तर ग्रामसेवक तालुक्याला-कसे मिळेल पाणी प्यायला असा प्रश्नच ग्रामस्थांना पडला आहे.लोहा तालुक्यातील उमरा हे शेवटच्या टोकावरील सर्कलचे गाव आहे.तसेच पाच तांडे मिळून येथे गट ग्रामपंचायत असल्याने या गावासाठी शासनाचा मोठा निधी येतो मात्र म्हणावा तसा विकास झाला नाही. जणू काय या तांड्यात शिक्षण आरोग्य पाणी प्रश्न पाचवीलाच पुंजलेला आहे की काय असा भाबडा प्रश्न ग्रामस्थातून उपस्थित होत आहे.त्यातच भर उन्हाळ्यात ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे परसराम तांडा येथे गेल्या पंधरा दिवसापासून कृत्रिम पाणी टंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांसह मुक्या जनावरांनाही पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.या बाबतीत नागरिकांनी ग्रामविकास अधिकारी यांना प्रत्यक्ष व फोनवरून संपर्क साधून तांड्यातील पाण्याची समस्या पूर्ववत करून आमची पाण्याची समस्या सोडविण्याची विनंती केली असता बघू मी १४ तारखेला परत येणार आहे.तेव्हा हा



विषय पाहू असे उडवा उडवी चे उत्तर ग्रामविकास अधिकारी यांच्याकडून मिळाले.सरपंच साईनाथ बालाजी पवार यांनाही येथील नागरिकांनी फोनवर आमच्या पाण्याचा प्रश्न सोडावा अशी विनंती मागणी केली असता मी हैद्राबाद येथे आहे आल्यावर पाहू असे उत्तर मिळाल्याचे तांडावासीयाकडून कळाले. तर तहानलेल्या मुक्या जनावरांसाठी आणि आमच्या मुलाबाळांसाठी न्याय मागावा तरी कुणाकडे असा प्रश्न ग्राम स्थातून उपस्थित होत आहे.

# बार्टी तर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी अभिवादन

अंबाजोगाई । प्रतिनिधी साक्षरतेचा मूलमंत्र देणारे, स्त्री शिक्षणाचे प्रणेते, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंती निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे, सामाजिक न्याय विभाग व महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था यांच्या मार्गदर्शनानुसार अंबाजोगाई तालुक्यातील समतादूत व्यंकटेश जोशी यांनी आज दिनांक ११/०४/२०२५ रोजी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती निमित्त विविध ठिकाणी अभिवादन व मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले होते. सांडेश्वर माध्यमिक विद्यालय चनई, महात्मा ज्योतिबा फुले वसतिगृह अंबाजोगाई, आदी ठिकाणी अभिवादन करून सामाजिक न्याय विभागाच्या व बार्टीच्या विविध योजनांची माहिती सांगण्यात आली. तसेच संविधान उद्देशिका भेट देऊन उद्देशीकेचे वाचन करण्यात आले. या प्रसंगी सांडेश्वर शाळेचे मुख्याध्यापक श्री. स्वामी सर, सहशिक्षक, बोकन सर, चव्हाण सर व इतर शिक्षक वृ ंद, वसतिगृहातील कार्यक्रमात अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. राजेश इंगोले यांच्या सह विद्यार्थी व कर्मचारी सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम सामाजिक न्याय विभागाचे सचिव, बार्टीचे महासंचालक सुनिल वारे सर व बीड जिल्हा प्रकल्प अधिकारी समतादूत प्रकल्प यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आला. बार्टी व सामाजिक न्याय विभागातर्फे १४ एप्रिल ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ची तारीख केंद्रीय मानून मसामाजिक समता सप्ताह म मसमता पंधरवाडा म अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविणे व त्याचा प्रचार प्रसार करण्यात येणार आह

# लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

लिंबागणेश:- ( दि.११ ) क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९८ व्या जयंतीनिमित्त आज दि.११ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत श्रीफळ फोडून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आबासाहेब हांगे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे,पत्रकार हरीओम क्षीरसागर,प्रा.लेनाजी गायकवाड यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षिका कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन भरत चौरे यांनी केले. महात्मा जोतिबा फुले यांच्या जीवनाची महती




वर्णन करताना सहशिक्षक अमर पुरी यांनी विद्येविना मती गेली! मतीविना नीती गेली!नीती विना गती गेली!गती विना वित्त गेले! वित्ताविना शुद्र खचले! इतके अनर्थ एका अविद्येने केले! महात्मा ज्योतिबा फुलेंनी जगाला दिलेल्या संदेशाची आठवण करून देत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंना साक्षर करून भारतातील पहिली स्त्री शिक्षिका बनवत शुद्रांसाठी शिक्षणासाठी केलेल्या संघर्षाची जीवनगाथा वर्णन केली.शिक्षणा बरोबरच थोर समाजसुधारक असलेल्या महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करुन शेतकरी आणि बहुजन समाजाच्या समस्यांना केंद्र स्थानी ठेवून पुरोगामी विचाराची मांडणी केली आणि महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली.त्याचबरोबर बालविवाहास विरोध, विधवा विवाहाला पाठींबा, अंधश्रद्धा निर्मूलन आणि महिलांना शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे कार्य केले असे प्रतिपादन केले.यावेळी सहशिक्षक संदिपान आगम,श्रीमती अयाचित व ग्राम स्थांची उपस्थिती होती.

# वडोली येथे श्री हनुमान जयंती उत्साहात साजरी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्री संकटमोचन हनुमान जयंती वडोली येथे उत्साहात साजरी हजारोंच्या संख्येने भाविक भक्तांनी संकटमोचन हनुमंताचे घेतले दर्शन किनवट माहुर तालुक्याचे आमदार भीमराव केराम माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, बाबूराव केंद्रे यांनीही वडोली येथील श्री.हनुमंताच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले.आमदार भीमराव केराम यांनी वडोली येथील हनुमान देवस्थानाच्या महाराजांसोबत चर्चा करून परिसराची देखभाल केली. श्री.हनुमान जयंती निमित्त सर्वत्र



जन्मोत्सव उत्साहात साजरा केला जातो.त्याचप्रमाणे वडोली, सारखणी येथे दरवर्षीप्रमाणे हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या ठिकाणी दरवर्षी सार्वजनिक भंडारा होऊन महाप्रसादाचा लाभ हा हजारोच्या संख्येने भाविक भक्त घेतात.या महामार्गावरील चालणाऱ्या सर्व वाहनातील नागरिक थांबून या दिवशी संकटमोचन हनुमंताचे दर्शनघेऊन महाप्रसाद आस्वाद घेतात.

# शासकीय तंत्रनिकेतन बीड येथे ईद मिलाप कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी नुकताच रमजान ईद हा मुस्लिम धर्मीयांमध्ये पवित्र असा सण साजरा झाला. शासकीय तंत्रनिकेतन बीड येथील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद च्या निमित्ताने शीरखुर्मा व अल्पोपहारचे आयोजन केले होते. डॉ मो.रा. लोहकरे यांनी सर्व मुस्लिम कर्मचाऱ्यांना ईद निमित्ताने शुभेच्छा दिल्या. समाजात वावरताना जातीय सलोखा राखत काम केल्यास एकमेका विषयी बंधुभाव व आपुलकी कायम राहते, रमजान ईद च्या पवित्र अशा शिकवणीनुसार एकमेकाविषयी मनात आपुलकीची भावना कायम जागृत राहते, मनाची व शरीराची शुद्धी होऊन मन प्रसन्न राहते. या बाबींचा मा. प्राचार्यांनी उल्लेख केला. यावेळी तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ लोहकरे सर, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा शेख सर, प्रा अन्सारी सर, प्रा.सोहेल सर, व कर्मशाळेचे प्रभारक सय्यद सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कर्मशाळा विभागाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे सदरील कार्यक्रमाच्या नियोजनात मोलाचे सहकार्य लाभले.



क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा जयंती निमित्त अभिवादन करतांना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, भाई संजय महाद्वार, आजिनाथ खेडेकर, गणेश घुबर्डे, सुशील पिंगळे, तालुका प्रमुख सोपान काका मोरे, रतन तात्या गुजर, गणेश जाधव, नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशी सह आदी

## ब्रह्मिभुत ढकळे महाराजांनी लावलेलं रोपट गगनाला गेलं - महंत लक्ष्मण महाराज मेंगडे

# मौजे बेलखंडी येथील ४७ व्या नामसप्ताहाची उत्साहात सांगता...!

( बीड प्रतिनिधी ) मौजे बेलखंडी येथील प्रसिद्ध श्री. क्षेत्र बेलखंडेश्वर महादेव संस्थान जागृत देवस्थान असून, संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. संत परंपरेचा वारसा असलेल्या या गावाला ब्रह्मिभूत, गु. साहेबराव महाराज ढकळे यांनी सुरू केलेला अखंड हरिनाम सप्ताहाला आज 47 वर्षे पूर्ण झाली. लवकरच या नाम सप्ताहाचा रौप्य महोत्सव होत असून, ब्रह्मिभूत ढकळे महाराजांची लावलेलं नामाच हे रोपट गगनाला गेलं. असे गौरोद्गार सप्ताहाचा सांगता प्रसंगी श्री. क्षेत्र बंकटस्वामी संस्थांचे मठाधिपती महंत ह.भ.प. लक्ष्मण महाराज मेंगडे यांनी व्यक्त केले. शेकडो वर्षापासून भंडारा स्वरूपात याठिकाणी नाम महोत्सवाची परंपरा होती. त्यांनतर ब्रह्मिभूत ढकळे महाराजांनी या ठिकाणी येऊन अखंड हरिनाम सप्ताहाची सुरवात केली. परिसरातील भक्तांना भगवंतांच्या नामाची गोडी लावली, ढकळे महाराजांची 35 वी पुण्यतिथी व सप्ताहाला आज 47 वर्षे पूर्ण



झाली. आज या नामसप्ताहाची उत्साहात सांगता झाली. परिसरातील हजारो भाविकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.. ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे यांच्या शुभहस्ते व ह.भ.प. परमेश्वर महाराज माने, ह.भ.प. दत्ता महाराज बडगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन,ह.भ.प. आचार्य भगवंत महाराज पुरी यांच्या मधुर आवाजात संगीत शिवपुराण कथा, हरिपाठ, शिवमहीम्न आदी कार्यक्रमाबरोबर, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज, ह.भ.प. भगवान महाराज शास्त्री, ह.भ.प. सत्यवान महाराज लाटे, ह.भ.प. राजू महाराज चोरडिया, ह.भ.प. परमेश्वर महाराज माने, ह.भ.प. भक्तीदास महाराज शिंदे, महंत स्वामी योगीराज महाराज, ह.भ.प. विष्णू महाराज तांदळे, ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री आदी संत महांतांची कीर्तने झाली..

# खासदारांनी घेतली सलग तीन तास रेल्वेची मॅरेथॉन बैठक : बीड-नगर-मुंबई रेल्वे सुरु करण्याचे दिले निर्देश

बीड: अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे काम या पूर्वीच्या बैठकांमधे निश्चित करुन देण्यात आलेल्या वेळेत होत असल्याबद्दल समाधान व्यक्त करत असतानाच कामाची गती मंदावू देऊ नका. बीड ते परळी रेलमार्गासाठी बाधित होत असलेल्या शेतकऱ्यांना भुसंपादनाचा मावेजा देताना काटकसर करु नका. भुसंपादनाची उर्वरित प्रकरणे तातडीने मार्गी लावा. विद्युतीकरणाच्या कामात येत असलेले अडथळ्यांवर मार्ग काढीत असताना रेल्वे क्रॉसिंगची काही कामे अर्धवट असून ती तातडीने पुर्ण करा. रेल्वेमार्गास विद्युत जोडणीच्या कामाला गती द्या, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी केल्या. दि.११ एप्रील रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ११ वाजता रेल्वे विभागाच्या बैठकीला सुरूवात झाली. बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मध्य रेल्वेचे उपमुख्य अभियंता लोळगे तसेच पाटोदा, बीड, माजलगाव महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, भूसंपादन अधिकारी, महावितरण विभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी, आहिल्यानगर आणि नांदेड रेल्वेचे मुकुंद नाईक, एम सुरेश, निगम, एस.आर.कुवर, संजय श्रीवास्तव, यादव, एस.के.मंडल, मानसिंग हे अधिकारी उपस्थित होते. यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गाला विद्युत जोडणीच्या कामाची सद्यस्थिती, आष्टी येथील स्थानकास विद्युत जोडणी देणेबाबतच्या कामाची सद्यस्थिती तसेच बीड ते वडवणी बीटमधील विद्युतलाईनचे कामाची स्थिती. वडवणी ते सिरसाळा बिट कामाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर आढावा घेतला. सुकळी, खामगाव व तपोवन या भागातील



नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन रेल्वेमार्गामधे प्रस्तावित करायच्या अतिरिक्त उपाययोजना, सिरसाळा ते परळी कामाची सद्यस्थिती. परळी-परभणी डबल लाईन कामामुळे बाधित होत असलेल्या (परळी)आजादनगर येथील नागरिकांवर कसलाही अन्याय होणार नाही याची दक्षता घेऊन सदरील काम तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बीड- नगर-मुंबई व बीड-नगर-पुणे इंटरसिटी सेवा चालू करणेसाठी करावयाच्या कामांबद्दल सुचना दिल्या. रायमोह, धनगरवाडी यासह अनेक भागातील शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीचा मावेजा बाबत निर्देश दिले. अधिकाऱ्यांचे आभार अन् अभिनंदन दि.१८ जून २४ च्या रेल्वे प्रकल्प बैठकीमधे ठरल्यानुसार आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्ग प्रकल्पातील बीडपर्यंतचे काम व गती चाचणी वेळेत पूर्ण केल्याबद्दल खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे विभागाचे सर्व अधिकारी, भुसंपादनाशी संबंधित महसूल विभागाचे अधिकारी व विद्युत विभागाचे संबंधित अधिकारी या सर्वांचे आभार मानत अभिनंदन केले. या कामांचे मागविले प्रस्ताव आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी, कडा तसेच पाटोदा तालुक्यातील गांधनवाडी, कारेगाव आणि शिरुर तालुक्यातील गोमळवाडा, विघनवाडी, हिवरसिंगा, घुगेवाडी/बरगवाडी आणि बीड तालुक्यामधे नवगण राजुरी, च-हाटा, धानोरा रोड या सर्व ठिकाणी रेल ओव्हर ब्रिज व बीड शहरालगत ढोलेवस्ती येथे रेल अंडरपास बांधण्याचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या. मुंबई येथील मध्य रेल्वेचे जनरल मॅनेजर यांचेशी प्रस्ताव व निधी मंजुरीबाबत चर्चा केली. धाराशिव-बीड-छ.संभाजीनगर या नवीन रेल्वेमार्गाच्या सर्व्हेक्षणास गती देण्याबाबत संबंधित अधिकारी यांना सूचना दिल्या. बार्शीनाका (इमामपूर) येथे अतिरिक्त रेल्वे थांबा देणे, नगर-बीड-परळी रेल मार्गावरील सर्व प्रमुख स्थानकाना लागणारी वीज उपलब्ध करणेसाठी स्थानकांवर सोलार उर्जा निर्मिती प्रकल्प तयार करावेत. यासाठी आवश्यक निधीच्या मागणीसह स्वतंत्र प्रस्ताव जनरल मॅनेजर यांचे कार्यालयास सादर करावेत अशा सूचना देण्यात आल्या.

## खरबुजाचे भाव घसरले! २३ रुपयावरून थेट १२ रुपयांवर, शेतकरी आर्थिक संकटात ; शेती परवडणार कशी?मसेवाडी येथील दत्ता मोरे यांचा सवाल:- डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेश:- ( दि.१२ ) खरबुजाच्या बाजारभावात लक्षणीय घसरण झाली आहे.पंधरवड्यापुर्वी २३ रूपये किलो असलेला भाव आज दि.१२ एप्रिल रोजी १२ रुपये किलोपर्यंत खाली आला आहे.यामुळे शेतकऱ्यांना खरबुज लागवडीवर झालेला खर्च वसूल करणे अवघड झाले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. उन्हाळ्यात थंडावा देणारे फळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खरबुजाची लागवड जानेवारीत झाली होती आणि मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून काढणी सुरू झाली आहे. रमजान महिना डोळ्यासमोर ठेवून अनेक शेतकऱ्यांनी खरबुजाची लागवड केली होती.परंतु मागणीच्या तुलनेत आवक वाढल्याने भावावर नकारात्मक परीणाम झाल्याचे पहावयास मिळाले.कुंदन जातीच्या खरबुजाला विशेष मागणी असली तरी रॉयल आणि विजय या जातीचे खरबुजही विक्रीसाठी बाजारात आलेले पहावयास मिळतात.

खरबुजाचे भाव निम्याने घसरले ; लागवडीवरील खर्च निघणं अवघड :- दत्ता मोरे (खरबुज उत्पादक शेतकरी मसेवाडी ता.बीड)

बीड तालुक्यातील बालाघाटावरील मसेवाडी येथील खरबुज उत्पादक शेतकरी दत्ता मोरे यांनी ३ एकर कुंदन वाणाच्या खरबुजाची लागवड केली. महिनाभरापूर्वी दीड एकर खरबूजाची विक्री करण्यात आली.तेव्हा २३ रुपये किलो भाव मिळाला. ऐन रमजानच्या शेवटच्या आठवड्यात निम्याने भाव कोसळले. कडक उन्हाळ्यात शेततळ्याचे पाणी देऊन कष्टाने आलेल्या खरबुज उत्पादनाचा खर्च सुद्धा निघणं अवघड झालंय. आम्ही घरचं ५ माणसं रानात राबणारे,खरबुज काढण्यासाठी ३०० रूपये मजुरीने आणलेले मजुर आणि कोसळलेले भाव त्यामुळे शेतकऱ्यांला कसं परवडणार अशी खंत शेतकरी दत्ता मोरे यांनी बोलून दाखवली.

# फेकून टाका वाघ्या कुत्रं, लांब कानाचं कुत्रं इंडियामध्ये.काय म्हणाले उदयनराजे ?

“छत्रपती शिवाजी महाराजांच राष्ट्रीय स्मारक दिल्लीत व्हावं. मुंबईत अरबी समुद्रात पंतप्रधान मोदींच्या हस्ते स्मारकाच भूमीपूजन झालं. मी सुद्धा त्यावेळी तिथे होतो. कदाचित पर्यावरणामुळे तिथे करता येत नसेल, तर गर्व्हनर हाऊसची जागा आहे. ही जवळपास 48 एकर जागा आहे. एखाद्या राज्यपालाला रहायला किती जागा लागते?. 48 एकर थोडी जागा नाही. ही जागा अरबी समुद्राला लागून आहे. त्या संदर्भात मी अमित शाह, देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहे” असं खासदार उदयनराजे म्हणाले.

“छत्रपती शिवाजी महराजांच राज्य हे रयतेच राज्य म्हणून ओळख होती. आज आपण ज्या लोकशाहीच वावरतो, त्याचा ढाचा छत्रपती शिवाजी महाराजांनी रचला. आम्ही ज्या मागण्या केल्या आहेत, त्याला कुठल्याही पैशाची किंवा बजेटची आवश्यकता नाही” असं उदयनराजे भोसले म्हणाले.

‘फुले’ चित्रपटाच्या वादावर काय म्हणाले?

महात्मा ज्योतिबा फुले यांच्यावर येणाऱ्या ‘फुले’ चित्रपटाबद्दल सुद्धा उदयनराजे बोलले आहेत. सेन्सॉर बोर्डाने त्यातील काही संवाद आणि दृश्यांवर कात्री चालवली आहे. त्यावर उदयनराजे म्हणाले की, “जे महाराजांना लागू होतं, ते महात्मा फुलेंना सुद्धा. महाराजांपेक्षा कोणी मोठा नाही. ज्यांनी महाराजांच्या विचारांच अनुकरण केलं, त्या सर्वांना लागू होतं. इतिहासकाराचं एक सेन्सॉर बोर्ड निर्माण करा. जे काय कट करायचं ते ठरवतील” असं उदयनराजे म्हणाले. छावा चित्रपटावरुन झालेल्या वादावर सुद्धा त्यांची हीच भूमिका होती.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर काय म्हणाले?




दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावरुन सुरु असलेल्या वादावरही उदयन राजे बोलले आहेत. “चॅरिटेबल म्हणजे काय, ही शासनाची जागा आहे. किमान 50 ते 70 मोठे चॅरिटेबल हॉस्पिटल असतील, किती चॅरिटी करतात ते. त्यांना ही जागा फ्री मध्ये दिली आहे. गरजूंवर मोफत उपचार झाले पाहिजेत. असं कोणी करत नाही, याचं ऑडिट झालं पाहिजे” असं उदयनराजे म्हणाले.

वाघ्या कुत्र्याच्या वादावर काय म्हणाले?

रायगड किल्ल्यावरील वाघ्या कुत्र्याच्या शिल्पावरुन सुरु असलेल्या वादावर त्यांनी रोखठोक भूमिका मांडली. “वाघ्या ते कुत्र बघा, ते इथलं तरी आहे का? लांब कानाचं कुत्रं इंडियामध्ये बघितलय का? ही ब्रिटिश कुत्री आहे. फेकून टाका, जास्त कौतुक कशाला हवं” असं उदयनराजे म्हणाले.

# राजकमल पेट्रोल पंपावर ग्राहकांना मिळणार एक लिटर पेट्रोलवर एक रुपयाची सूट

## नगर रोड वरील जियो बीपी पेट्रोलचा ग्राहकांनी लाभ घ्यावा : लाटे

बीड (प्रतिनिधी) आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत घट झाली आहे, परंतु भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत कोणतीही कपात झालेली नाही. तसेच ग्राहकांना कोणताही फायदा देण्यात आला नाही. त्याचवेळी, जियो बीपी कंपनीने पेट्रोल व डिझेल खरेदी करणाऱ्या ग्राहकांना दिलासा दिला आहे. देशभरातील या कंपनीच्या पेट्रोल पंपांवर ग्राहकांना पेट्रोल व डिझेल एक रुपयाने स्वस्तात दिले जाणार आहे.बीडमधील नगर रोडवरील राजकमल पेट्रोल पंपाच्या जिओ बीपी पंपावर आजपासून ग्राहकांसाठी ही सेवा सुरू करण्यात आली असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन राजकमल पेट्रोल पंपाचे विजय लाटे यांनी केले आहे.

सध्या पेट्रोलची किंमत १०७ रुपयांपेक्षा जास्त आहे. त्याच वेळी जिओ बीपी कंपनीच्या पेट्रोल पंपावर ग्राहकांना १ रुपये दराने स्वस्त पेट्रोल व डिझेल विकले जाणार आहे. कंपनीचे बीड येथील डीलर राजकमल पेट्रोल पंपाचे विजय लाटे म्हणाले की, शहरातील नगर रोड भागात असलेल्या राजकमल पेट्रोल पंपावर जिओ बीपी पेट्रोल व डिझेल खरेदी करणाऱ्या ग्राहकांना आज पासून लिटर मागे एक रुपयाची सूट दिली जाणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पेट्रोल व डिझेल खरेदी करणाऱ्या ग्राहकांना या सेवेचा लाभ घेता येणार आहे. राजकमल पेट्रोल पंपावर महिनाभरासाठी ही सेवा सुरू करण्यात आली असून याचा कालावधी आणखी दोन महिने वाढू शकतो असेही विजय लाटे म्हणाले.




# गप्पेवाडी-नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचा रस्ता लागला हातानेच उखडायला

## मे.प्रवीण कन्स्ट्रक्शन कंपनीच्या मनमानी कारभारामुळे नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील गप्पेवाडी, नामेवाडी येथील मुख्यमंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत रस्त्याचे झालेले काम हे निकृष्ट दर्जाचे झालेले आहे. तर सदर रस्त्याचे काम करणारी मे.प्रवीण कन्स्ट्रक्शन कंपनीच्या मनमानी कारभारामुळे नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नागरिकांनी दिली आहे. मुख्य मंत्री ग्राम सडक योजने अंतर्गत रस्त्याचे काम चालू असताना आम्ही गुत्तेदार यांना मोबाईल वर संपर्क साधुन सदरील काम निकृष्ट दर्जाचे होत आहे असे सांगितले असता गुत्तेदाराने सदरील काम हे अंदाजपत्रका प्रमाणे होत आहे असे उत्तर दिले परंतु आम्ही या कामावर खूष नाहीत असे बोलून आम्ही या कामाची तक्रार करणार आहेत. तेव्हा गुत्तेदाराने सांगितले की, तुम्ही बिनधास्त तक्रार द्या आम्हाला काही फरक पडत नाही असे सांगून सदरील काम हे सर्व निकृष्ट दर्जाचे केले आहे आम्ही सदरील रस्त्यावर तब्बल १५ दिवसाच्या नंतर गेलो असताना सदरील रस्ता हा उखडलेला दिसल्यावर आम्ही हातानेच उखडून पाहीला असता सदर डांबरी रस्ता हा हातानेच उखडून निघत आहे.तरी हे काम चांगले केले नाही तर आम्ही ग्रामस्थ तहसील कार्यालयासमोर आंदोलन करनार किंवा उपोषणाला बसणार आहोत असे मत व्यक्त केले आहे. सदर काम आहे निकृष्ट दर्जेचे केलेले आहे सदर कंपनीवर बांधकाम विभाग काय कारवाई करणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले.

# सामाजिक कार्यकर्ते सुनील इंगळे यांची पुरस्काराची हॅट्रिक

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी

पुरस्कार प्रेरणा देतात आणि त्यातून राष्ट्र निर्मिती होते या दृष्टिकोनातूनच विविध मान्यवर व तळागाळात कार्य करणाऱ्या संस्था असतात. त्या निरपेक्ष वृत्तीने आपले समाजाभिमुख व लोकाभिमुख कार्य करीत असतात आणि त्यातूनच समाजातील तन-मन धनाने कार्य करणाऱ्या समाजसेवकांचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांची उमेद वाढवण्यासाठी कार्यरत असतात अशाच काही राज्यस्तरीय संस्थांनी सुनील इंगळे यांचा यथोचित गौरव करण्यासाठी त्यांची निवड केली आहे याचे विशेष कौतुक म्हणजे या महिन्यात त्यांनी पुरस्काराची हॅट्रिक केली आहे मुंबई येथील ङ्ग जॉय ऑफ गिविंग ग्रुप ङ्ग ही नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर असलेली संस्था चे अध्यक्ष गणेश जी हिरवे यांनी ङ्गआदर्श समाजसेवक ङ्ग पुरस्कार जाहीर केला आहे तसेच प्रेरणा कुलकर्णी हे सामाजिक क्षेत्रात जे कार्य करतात की, जे आपल्या स्वप्नात सुद्धा नसेल,अशी सेवा लॉकडाऊन मध्येही त्याच्या अगोदरही व आज पावतो निस्वार्थ वृत्तीने कार्य करणाऱ्या ङ्ग प्रेरणा फाउंडेशन ङ्ग तर्फे ङ्ग समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले राष्ट्र गौरव पुरस्का जाहीर केला आहे

# स्त्री मुक्तीचे जनक महात्मा ज्योतिराव फुले :- श्रीमती गायके मॅडम

पाटोदा प्रतिनिधी :-

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी मु.अ. मोरे सर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले . प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेल्या श्रीमती गायके मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महात्मा ज्योतिबा फुले हेच खरे स्त्री मुक्तीचे जनक आहेत असे व्यक्त केले जुन्या काळी स्त्री चूल आणि मूल यातच गुंतलेली होती पुरुष सत्ताक संस्कृतीमुळे स्त्रियांना घराच्या बाहेर पडणे शक्य नव्हते त्याकाळी महात्मा ज्योतिबा फुले यांनी सावित्रीबाईना घेऊन मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून स्त्रीमुक्तीचा सुरुवात केली आज भारताच्या सर्वोच्च राष्ट्रपती पदापर्यंत स्त्री पोहोचली प्रत्यक क्षेत्रामध्ये स्त्रीचे योगदान आहे पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून आज स्त्री समाजामध्ये कार्यरत आहे प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रीचे योगदान मोठे आहे या सर्वांचं श्रेय फक्त महात्मा ज्योतिबा फुले यांनाच जातं.




ज्ञानानेच माणूस समृद्ध होऊ शकतो असे सांगताना विद्यार्थ्यांनी खूप अभ्यास करून आपल्या भविष्याला आकार द्यावा असेही यावेळी त्यांनी व्यक्त केले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मोरे सर हे होते तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री उगले सर यांनी करून प्रमुख मार्गदर्शक श्रीमती गायके मॅडम यांचे स्वागत श्रीमती शेलार मॅडम यांनी केले तर आभार श्री माताडे सर यांनी मानले.. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी तथा पालक शिक्षक सर्व उपस्थित होते

# शारदा इंग्लिश स्कूल केज येथील इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक शिक्षण प्रक्रियेस जोडण्याचा प्रयत्न-रमेशराव आडसकर

## हजारो पालकांच्या उपस्थितीत इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड उद्घाटन उदघाटन समारंभ संपन्न

केज/प्रतिनिधी

शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेने अल्पावधीतच यशाची प्रचंड भरारी घेतली असून शाळेत सातत्याने नवनवीन उपक्रम राबवण्यात येत असतात. आता शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेतील शिक्षण स्मार्ट बनले असून फळा व खडूच्या जागी इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे दिले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना अध्यापन करताना आता शिक्षकांच्या हाती खडू ऐवजी डिजिटल पेन असणार आहे. पुस्तकाचे ऐवजी पेन ड्राईव्ह असणार आहे. सदरील इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड चे उद्घाटन रमेशराव आडसकर तसेच केज शहरातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षण प्रेमी, पालक वर्ग, यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी बोलताना रमेशराव आडसकर यांनी सांगितले की विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास करण्यासाठी संस्थेच्या वतीने सातत्याने अनेक उपक्रम राबविण्यात येत असतात. या उपक्रमाच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरचे अत्याधुनिक ज्ञान मिळावे व विद्यार्थी,शिक्षक,शाळा आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडले जावेत



हा प्रमुख उद्देश असल्याची त्यांनी पालकांना मार्गदर्शन करताना मत व्यक्त केले. यावेळी शाळेचे प्राचार्य मिश्रा एस.एम.यांनी पालकासमोर आपले मत व्यक्त करताना सांगितले की सदरील स्मार्ट बोर्ड हे टच स्क्रीन असणार आहेत त्याच्या मदतीने विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जास्तीत जास्त सखोल ज्ञान मिळावे हा प्रमुख उद्देश आहे. चालू घडामोडी, जगभरातील माहिती प्रत्यक्ष रूपाने पाहता येईल यासाठी सदरील उपक्रम शाळेच्या वतीने आमच्या मार्गदर्शिका श्रीमती अर्चनाताई आडसकर यांच्या सूचनेनुसार आम्ही राबवत आहोत. याचा निश्चितच फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. यावेळी शाळेचे उपप्राचार्य सुरज सनी यांनी संस्थेच्या वतीने उपलब्ध केलेले इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड हे हाय स्पीड इंटरनेटने जोडलेले असून विद्यार्थ्यासाठी ज्ञानाचा खजिना असल्याचे मत त्यांनी मांडले. याचा फायदा विद्यार्थी निश्चितच,घेतील अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. यावेळी केज शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती, शिक्षण प्रेमी, महिला पालक याची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. अतिशय खेळीमेळीचे आणि आनंदमय वातावरणात उद्घाटन सोहळा पार पडला.केज शहरातील व परिसरातील शाळेमधील हा पहिला उपक्रम असल्याचे मत पालकांच्या वतीने व्यक्त करण्यात येत होते. यावेळी सर्व पालकांनी विविध वर्गात जाऊन इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड ची हाताळणी कशी केली जाते हे प्रत्यक्ष जाऊन पाहिले. विद्यार्थ्यांशी चर्चा केली, संस्थेच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या या सुविधेबद्दल त्यांनी संस्थेचे आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेच्या वतीने प्रमुख पाहुण्यांचे पालकांचे उपस्थितांचे आभार देशमुख पी. एम.यांनी व्यक्त केले व कार्यक्रमाचा समारोप केला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com